अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
०१.०८.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे सप्तशृंगगड-नांदुरी घाट रस्ता बंद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – भारतीय हवामान विभागाने नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांसाठी आजही पावसाचा अलर्ट दिलेला आहे. शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता हवामान विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार प्रशासनाने हा निर्णय घेतला. जिल्हाधिकारी नाशिक, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कळवण आणि तहसीलदार कळवण यांच्या सूचनेनुसार श्री सप्तश्रृंगगड निवासिनी देवी ट्रस्टने ३१ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून घाटमार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी आणि भाविकांच्या प्रवासासाठी बंद केला आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आंध्र प्रदेशात 'अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळा'चे उद्घाटन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**विझियानगरम** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी आंध्र प्रदेशातील भोंगापुरम (विझियानगरम) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या 'अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळाचे' भव्य उद्घाटन करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यानंतर पंतप्रधान मोदी तब्बल १७,९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांचे देशाला लोकार्पण करणार आहेत. या सोहळ्याला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे प्रमुख नेते विशेषत्वाने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी कर्नाटकातील म्हैसूर येथे रवाना होणार असून, दुपारी ३:३० वाजता श्री रामकृष्ण आश्रमातील 'स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र – विवेक स्मारक'चे उद्घाटन करून उपस्थितांना संबोधित करतील.

५,६४० कोटींचा प्रकल्प; वर्षाला ६० लाख प्रवाशांची क्षमता! पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, हा ग्रीनफिल्ड विमानतळ 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप' मॉडेलअंतर्गत ५,६४० कोटी रुपयांहून अधिक खर्च करून उभारण्यात आला आहे. या विमानतळाची क्षमता वार्षिक तब्बल ६० लाख प्रवाशांना सेवा देण्याची आहे.

प्रवाशांचा प्रवास अत्यंत सोपा, सुखकर आणि आधुनिक व्हावा, अशा पद्धतीने याच्या पॅसेंजर टर्मिनलची रचना करण्यात आली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विमानतळावर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सोयीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेटेड बॅगेज हँडलिंग सिस्टम (सामान वाहून नेणारी यंत्रणा), बायोमेट्रिक एंट्री आणि स्मार्ट मॉनिटरिंग यांसारख्या हाय-टेक सिस्टीमचा समावेश आहे. यामुळे विमानतळाचे काम वेगाने होईल आणि प्रवाशांचा वेळ वाचेल.

पर्यावरणपूरक आणि 'ग्रीन बिल्डिंग' डिझाईन हा विमानतळ केवळ आधुनिकच नाही तर पूर्णपणे पर्यावरणपूरक आहे. येथे ५ मेगावॉटचा सौर ऊर्जा प्रकल्प, पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था आणि ई-व्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले आहेत. अमेरिकेच्या 'युएस ग्रीन बिल्डिंग कौन्सिल'च्या मानकांनुसार या टर्मिनलची रचना करण्यात आली आहे.

# भारताच्या सुरक्षाव्यवस्थेचा कायापालट करणाऱ्या अजित डोवालांचं पुण्यातील भाषण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – लोकमान्य टिळक यांच्या १०६व्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा हा पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना यंदाचा 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' देण्यात आला आहे. या पुरस्कार वितरणासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार उपस्थित होते, पुरस्कार प्रदान केल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना डोवाल म्हणाले की 'मी या मंचावर येऊन स्वतःला एका मोठ्या संभ्रमात अनुभवत आहे. आदरणीय गृहमंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि ज्या सर्व लोकांनी माझ्याबद्दल भाष्य केले, त्या सर्वांचे मी आभार मानतो. माझ्याबद्दल आपण जी धारणा ठेवता, त्याबद्दल मी नमन करतो. आभार मानण्यासाठी माझ्याकडे शब्दही अपुरे आहेत,' अशा शब्दांत भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते अजित डोवाल यांना 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अत्यंत नम्रतेने स्वीकारत असल्याचे सांगत त्यांनी गौरवान्वित आणि नतमस्तक असल्याचे नमूद केले. 'पुण्यातील शालेय दिवसांच्या आठवणी अनब टिळकांचे विचार' आपल्या भाषणात जुन्या आठवणींना उजाळा देताना डोवाल म्हणाले, 'मी माझ्या शालेय जीवनाची सुरुवात पुण्यातूनच केली होती. सुमारे एक-दीड वर्ष मी इथे होतो.

# मंत्री गिरीश महाजनांचा प्रशासनाला अल्टिमेटम

### सात दिवसांत 'नाशिक खड्डेमुक्त'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – नाशिक शहरातील खड्ड्यांमुळे नागरिकांचा वाढता रोष आणि अपघाती मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर मंत्री गिरीश महाजन यांनी प्रशासनाला थेट अल्टिमेटम दिला आहे.

येत्या सात दिवसांत नाशिक शहर खड्डेमुक्त झाले पाहिजे, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. शनिवार (दि.१) पासून खड्डे बुजविण्याच्या मोहिमेला सुरुवात होणार असून, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांमुळे पुढील २५ ते ३० वर्षांचा रस्त्यांचा प्रश्न कायमचा सुटणार असल्याचा दावा महाजन यांनी केला.

मंत्री गिरीश महाजनांचा प्रशासनाला दणका शहरातील रस्त्यांची दुरवस्था, खड्ड्यांमुळे झालेले मृत्यू आणि नागरिकांच्या संतापाच्या पार्श्वभूमीवर मंत्री गिरीश महाजन यांनी शुक्रवारी महापालिकेतील स्थायी समितीच्या कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

यावेळी त्यांनी रस्ते दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेत ठेकेदार आणि प्रशासनाला तातडीने कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस महापौर हिमगौरी आहेर-आडके, स्थायी सभापती मच्छिंद्र सानप, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार राहुल ढिकले, आयुक्त मनीषा खत्री स्थायी समितीचे माजी सभापती गणेश गिते तसेच बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

खड्डे बुजविताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना मंत्री गिरीश महाजन म्हणाले, 'रस्त्यांमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ठेकेदार कामे वेळेत करीत आहेत की नाही, याची तपासणी करा.

# अमित शाहांकडून अजित डोवाल यांचं तोंडभरुन कौतुक

### पंतप्रधान मोदींनी दिलेला महत्वाचा सल्ला आणि पहिल्या भेटीचा किस्सा सांगितला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नागपूर** – 'मी लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे मनस्वी आभार मानतो की त्यांनी हा पुरस्कार अजित डोवाल यांना जाहीर केला. तसेच हा पुरस्कार देण्यासाठी मला इथे बोलावलं.

यासाठी देखील मी लोकमान्य टिळक स्वराज्य संघाला धन्यवाद देतो. पुरस्कार हा लोकांच्या कार्याला प्रेरणा देण्याचे एक माध्यम आहे. एखादी व्यक्ती समाजातल्या कुठल्याही क्षेत्रामध्ये खूप मोठं कार्य करते, तेव्हा तो केवळ तिथेच थांबून न राहता त्याच्या हातूतून आणखी भव्यदिव्यं काम होणं अपेक्षित राहतं. मात्र, जेव्हा समाजाकडून कृतज्ञता भाव व्यक्त होतो, तेव्हा त्या माणसाचं मनोबल वाढत असतं. शिवाय समाजाचे ते दातृत्व आणि कर्तव्य असले पाहिजे. अजित डोवाल यांना हा पुरस्कार मिळत आहे, याचा मला आज अतिशय आनंद असल्याची भावना देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बोलताना व्यक्त केली.

यावेळी त्यांनी अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करत त्यांची आणि अमित शाहांचा परिचय कसा झाला, यावरही भाष्य केलं आहे.

पुण्यात लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (लोकमान्य टिळक स्वराज्य संघ) वतीने देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना आज लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. हा पुरस्कार अमित शाह यांच्या हस्ते मुकुंद नगर येथील कटारिया हायस्कूलच्या मैदानावर होणाऱ्या सोहळ्यात प्रदान करण्यात आला, यावेळी अमित शाह बोलत होते.

# 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या फॉरेन फंडिंगची चौकशी सुरु

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे** – नीट पेपरफुटी प्रकरणी आंदोलन उभारणाऱ्या 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) या संघटनेला परदेशातून निधी (फॉरेन फंडिंग) मिळत असल्याच्या संशयावरून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्रात राज्य गृह विभाग आणि केंद्र स्तरावर अंमलबजावणी संचालनालय यांच्याकडून तपास सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. त्यामुळे ही संघटना आता राज्य व केंद्रीय तपास यंत्रणांच्या रडारवर आल्याचे स्पष्ट झाले आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे ३५ दिवस चाललेल्या आंदोलनादरम्यान सीजेपीने नीट पेपरफुटी आणि तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. या आंदोलनासाठी सीजेपीला परदेशातून निधी पुरवला जात असल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपांची दखल घेत सरकारने चौकशीचे आदेश दिले आहेत. परदेशी निधीचा वापर देश, राज्य किंवा समाजात अस्थिरता निर्माण करण्यासाठी केला जात असेल, तर अशा संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा गृहराज्यमंत्र्यांनी दिला आहे.



# अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे हे नाट्यगृह म्हणजे समाजाप्रती असलेली समर्पणाची कृती

**महापालिकेच्या वतीने भायखळ्यातील कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले गौरवोद्गार**

■ *(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

***मुंबई*** – लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून कल्पनाशक्तीपेक्षा वास्तविकता अधिक प्रखरपणे मांडली आहे.

कष्टकरी कामगारांची परिस्थिती, त्यातून निर्माण झालेला संघर्ष आणि संघर्षातून उमटलेले समाजाचे प्रतिबिंब ही त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये आहेत.




त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून उभारण्यात आलेले हे नाट्यगृह म्हणजे समाजाप्रती असलेली समर्पणाची कृती आहे, असे मनोगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

दक्षिण मुंबईतील भायखळा पूर्व रेल्वे स्थानकापासून जवळ असणाऱ्या नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण शुक्रवारी ३१ जुलै २०२६ रोजी पार पडले. यावेळी माननीय मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या लोकार्पण सोहळ्याला उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद उपसभापती सचिन अहिर; कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सह पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विशेष समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच उप आयुक्त, सहायक आयुक्त यांच्यासह मान्यवर, नागरिक, कलावंत, रसिक उपस्थित होते.

# ‘समुद्र मंथन’ला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली*** – केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी ‘समुद्र मंथन’– राष्ट्रीय ऑफशोअर एक्सप्लोरेशन योजनेला औपचारिक मंजुरी दिली आहे. सागरी तेल आणि नैसर्गिक वायूच्या शोधाला गती देण्यासाठी या योजनेंतर्गत २०२३०–३१ या आर्थिक वर्षापर्यंत ८४,०८४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.



या योजनेमुळे सुमारे ६०० दशलक्ष मेट्रिक टन तेल समतुल्य नवीन इंधन साठे शोधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ऊर्जा क्षेत्रात नवीन रोजगाराच्या संधी मिळेल. पीएम किसान योजनेला मुदतवाढ केंद्र सरकारने ’प्रधानमंत्री किसान सन्मान निधी’ योजनेचा विस्तार पुढील पाच वर्षांसाठी म्हणजे आर्थिक वर्ष २०३०–३१ पर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली आहे. या कालावधीसाठी ३,१५,६१४ कोटी रुपयांच्या आर्थिक निधीची तरतूद केली आहे.

**स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त**

# जनसेवा सप्ताहांतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

■ *(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

***शेंदुरजनाघाट*** – राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी चार्टर्ड अकाऊंटंट ही देशातील अत्यंत प्रतिष्ठेची परीक्षा यशस्विरीत्या उत्तीर्ण झाल्याबद्दल बालपांडे यांचा माजी आमदार देवेंद्र भुयार यांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाला माजी आमदार देवेंद्र भुयार, बाळु कोहळे, सुभाषराव शेळके, विष्णुपंत निकम, नगरपरिषद गटनेते संदीप खडसे, नगरसेवक विशाल सावरकर, राकेश दवंडे, शेख नासिर, इफ्तेखार अहमद, सुनीता उईके व जाकिया बानो यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नामदेव कळंबे, सुरेश माळोदे, गौरव गणोरकर, लुकेश वंजारी, हर्षल सरोदे, नाना नवरंग, मोहम्मद अकील, शैलेश विटाळकर, प्रफुल वघाळे, हिमांशू माकोडे, रेखा अढाऊ, सुनिता अकर्ते, लोकेश गोहाड, बाबू दवंडे, दिनेश आमले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी सारंग बालपांडे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या यशाचे कौतुक केले.

जनसेवा सप्ताहाच्या माध्यमातुन समाजोपयोगी, शैक्षणिक व लोकहिताचे विविध उपक्रम राबवुन समाजातील विविध घटकांचा सन्मान करण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रयत्न स्तुत्य असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

**शारदा वारकरी महिला भजन मंडळ अमडापुरच्या वतीने**

# आषाढी एकादशीनिमित्त हरिनाम गजराने भाविक मंत्रमुग्ध

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – आषाढी एकादशीनिमित्त अमडापूर येथील श्री हनुमान मंदिरात भक्तिमय वातावरणात भजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात गावातील वारकरी, महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजर आणि विठ्ठलनामाच्या भक्तीरसाने दुमदुमून गेला होता.

या प्रसंगी शारदा वारकरी महिला भजन मंडळाने अत्यंत सुरेल व भावपूर्ण भजन सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. विठ्ठल–रुक्मिणीच्या नामस्मरणाने आणि अभंगांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. उपस्थितांनी महिला मंडळाच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले.



भजन कार्यक्रमानंतर सर्व उपस्थित भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात गावातील बहुसंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवुन आषाढी एकादशीचा उत्सव भक्तिभावाने साजरा केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शारदा वारकरी महिला भजन मंडळातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. मंडळातील छाया बोबडे, ललिता बेले, सुनिता साबळे, सुनिता बेले, उषा काळे, प्रमिला साबळे, सुषमा बेले, हर्षा साबळे, रंजना साबळे, निर्मला दापूरकर, वेणु सोनारे, नंदा बेले आणि ललिता काळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

आषाढी एकादशीनिमित्त आयोजित या भक्तिमय सोहळ्यामुळे अमडापूर गावात आध्यात्मिक आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले असून उपस्थित भाविकांनी अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे स्वागत केले.

# दिल्ली पोलिसांच्या नावाने खोटा व्हिडिओ प्रसारित करणं काँग्रेस नेते भाई जगतापांना भोवलं

**भाजपच्या तक्रारी नंतर गुन्हा दाखल**

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***दिल्ली*** – पोलिसांचे ऊझझ सुमित झा यांच्या नावाने अख–जनरेटेड बनावट व्हिडिओ सोशल





मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी काँग्रेस नेते भाई जगताप यांच्या विरोधात महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र सायबरच्या नोडल सायबर पोलीस ठाण्यात ऋखठ क्रमांक ००६३/२०२६ नोंद करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता कलम ३५३(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाजप सोशल मीडियासह संयोजक निखिल भामरे यांच्या तक्रारीवर ही कारवाई करण्यात आली आहे. एफआयआर नुसार, @Bhaijagtap1 या एक्स हँडलवरून दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असल्याचा भास निर्माण करणारा अख–जनरेटेड व्हिडिओ प्रसारित करण्यात आला. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, पडताळणीत हा व्हिडिओ बनावट असल्याचे समोर आले असून, समाजात संभ्रम निर्माण करणे आणि जनतेची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने तो प्रसारित केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शहापुर**

# जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी पात्र

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***वरुड*** – तालुक्यातील शहापूर येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा शहापूर येथील वर्ग सातवीची विद्यार्थिनी नूतन सुनील उईके सातवी शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये पात्र ठरून शाळेच्या शैक्षणिक यशात मानाचा तुरा रोवला आहे.



या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य मुख्याध्यापक शिक्षकांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देत त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक करण्यात आले.

नूतन हिच्या या यशामागे तिची मेहनत सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांची मोलाचे मार्गदर्शन यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक किशोर भडांगे, मनीष दिघेकर, आशा चहांदे, अरुण देशमुख, रंजना कडू, गोपाल वानखडे, संजय गाडबैल विद्यार्थिनी नूतनचे अभिनंदन केले आहे.

**वाठोडा येथील आर.जी.देशमुख बुनियादी बालविद्या मंदिर येथे**

# वारकरी दिंडी उत्साहात संपन्न





■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**चांदस वाठोडा** – आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने आर.जी.देशमुख बुनियादी बालविद्या मंदिर वाठोडा येथे वारकरी दिंडीचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. या दिंडीत शाळेतील विद्यार्थी–विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी वारकरी व संतांच्या वेशभूषेत विविध नामघोषात गावातून दिंडी काढली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार, भक्ती, संस्कार आणि सामाजिक ऐक्य यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. अशा प्रकारचे शालेय दिंडी उपक्रम शाळांमध्ये वारकरी परंपरेची ओळख करून देण्यासाठी आयोजित केले जातात. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना संतांच्या शिकवणीप्रमाणे सत्य, प्रेम, समता व मानवतेचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन केले. गावकऱ्यांनीही दिंडीचे स्वागत करून, दिंडीमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले.

वारकरी दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आणि विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्यांची जपणूक करण्याचा सुंदर संदेश देण्यात आला. या उपक्रमात शाळेचे पदाधिकारी, ग्रामस्थ, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

**जिल्हा परिषद पूर्व म**

# योध्दे आणि कुटूंबियांच्या सत्कार समारंभाचे आयोजन

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून शहरात युद्धवीर व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार सो–हळा देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची पर्वा न करता शौर्य गाजविणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शहरातील प्रसिध्द गावंडे ज्वेलर्सच्या वतीने अष्टविनायक सभागृह येथे योध्दे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.





या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन नगराध्यक्ष ईश्वर सलामे, शुभेदार माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष नारायण पोहरकर, उपाध्यक्ष शुभेदार साहेबराव उंबरकर, माजी सैनिक संजय जिचकार, ठाणेदार अशोक जाधव, स्त्रिरोग तज्ञ डॉ.मिना बंदे, शिवप्रसारक मंडळ अचलपुरचे अध्यक्ष गजानन कोल्हे, गावंडे ज्वेलर्सचे संचालक निलेश गांवडे, नगरसेवक देवेंद्र बोडखे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गावंडे ज्वेलर्सच्या युद्धवीर तसेच त्यांच्या कुटूंबियांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी उभे राहून भारतमातेच्या वीर सुपूत्रांना मानवंदना अर्पण केली. मान्यवरांनी आपल्या मनोगतात कारगिल युद्धातील शूर जवानांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवा यांचा गौरव करताना, सैनिकांमुळेच देश सुरक्षित असल्याचे सांगितले. सैनिकांच्या कुटूंबियांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असून समाजाने त्यांच्याप्रती सदैव कृतज्ञ राहावे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमात देशभक्तिपर गीतांनी वातावरण भारावुन गेले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक, माजी सैनिक, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व युवक उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन राजकुमार महल्ले, प्रास्तविक निलेश गांवडे तर आभार रितेश खंडेलवाल यांनी मानले.

## संपादकीय


**संकटांना घाबरून पळण्यापेक्षा त्यांचा धैर्याने सामना करा, विजय निश्चित मिळेल**

### आरक्षणाचा आधारच इथली जातीव्यवस्था!

भारतातील आरक्षणाचा प्रश्न हा केवळ नोकऱ्या, शिक्षण किंवा राजकीय प्रतिनिधित्वापुरता मर्यादित नाही. तो भारतीय समाजाच्या हजारो वर्षांच्या सामाजिक रचनेशी जोडलेला आहे. 'आरक्षणाचा आधारच इथली जातीव्यवस्था आहे. जातीव्यवस्थाच नसेल तर जातीआधारित आरक्षणाचा प्रश्नच उद्भवत नाही,' हे विधान भारतीय वास्तवाचे नेमके चित्रण करणारे आहे. आरक्षण हे कोणत्याही समाजाला विभागण्यासाठी निर्माण केलेले धोरण नसून, शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक विषमतेवर उपाय म्हणून स्वीकारलेली घटनात्मक व्यवस्था आहे. भारतीय समाजात जन्माला येणाऱ्या व्यक्तीची सामाजिक ओळख अनेकदा तिच्या गुणवत्तेपेक्षा तिच्या जातीवर ठरत आली. शिक्षण, जमीन, व्यवसाय, मंदिरप्रवेश, सार्वजनिक विहिरींचा वापर, सामाजिक प्रतिष्ठा अशा अनेक क्षेत्रांत जातीच्या आधारावर भेदभाव करण्यात आला. काही जातींना सर्व अधिकार लाभले, तर काही समाजघटकांना मूलभूत मानवी हक्कांपासूनही वंचित ठेवण्यात आले. या ऐतिहासिक अन्यायामुळे निर्माण झालेली दरी एका पिढीत भरून निघणारी नव्हती. म्हणूनच भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांनी समानतेच्या तत्त्वाला प्रत्यक्षात आणण्यासाठी आरक्षणाचा मार्ग स्वीकारला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान तयार करताना समान संधीचा विचार मांडला. मात्र त्यांनी हेही स्पष्ट केले की, समानतेची सुरुवात असमान परिस्थितीतून होऊ शकत नाही. जो समाज हजारो वर्षे शिक्षणापासून दूर ठेवला गेला, त्याला स्पर्धेत उभे राहण्यासाठी विशेष संधी देणे आवश्यक आहे. आरक्षण म्हणजे विशेषाधिकार नसून समान संधी निर्माण करण्याचे साधन आहे. त्यामुळे आरक्षणाची तुलना केवळ गुणवत्तेशी करणे चुकीचे ठरते. आज अनेकदा असा युक्तिवाद केला जातो की, 'जातीपाती संपल्या आहेत, मग आरक्षणाची गरज काय?' मात्र वास्तव वेगळे आहे. आजही विवाह, सामाजिक संबंध, ग्रामीण भागातील वस्ती, राजकारण, स्थानिक सत्ताकेंद्रे आणि अनेक सामाजिक व्यवहार हे मोठ्या प्रमाणावर जातीनुसारच ठरतात. दलितांवरील अत्याचार, सामाजिक बहिष्कार, भेदभावाच्या घटना सातत्याने समोर येतात. अशा परिस्थितीत जातीव्यवस्था संपली आहे, असे म्हणणे वास्तवाला डोळेझाक करणारे ठरेल. आरक्षणाच्या विरोधकांचा आणखी एक मुद्दा म्हणजे आर्थिक निकषावर आरक्षण असावे. आर्थिक दुर्बलता निश्चितच महत्त्वाची आहे. गरिबी कोणत्याही समाजघटकात असू शकते. परंतु जातीआधारित भेदभाव आणि आर्थिक गरिबी या दोन वेगळ्या समस्या आहेत. एखादी व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम असली तरी तिला तिच्या जातीमुळे सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागू शकतो.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : संघर्षातून उभा राहिलेला शब्दसम्राट आणि मानवतेचा महामेरु

'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकरी, श्रमिक आणि दलितांच्या तळहातावर तरलेली आहे' या एका वाक्यात अण्णाभाऊ साठे यांचे संपूर्ण जीवनतत्त्वज्ञान सामावलेले आहे. साहित्य, शाहिरी, लोकनाट्य, पोवाडे, लावण्या आणि क्रांतिकारी विचार यांच्या माध्यमातून त्यांनी समाजातील उपेक्षित, शोषित आणि कष्टकरी माणसांच्या जीवनाला शब्द दिले. म्हणूनच अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते; ते लोकशाहीर, समाजप्रबोधनकार, परिवर्तनवादी विचारवंत आणि मानवतेचे महान लेखक होते.



**जन्म आणि बालपण –** अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे. वडिलांचे नाव भाऊ सिधोजी साठे, तर आईचे नाव वालुबाई होते. ते मातंग समाजात जन्मले. त्या काळात या समाजावर अन्याय, अस्पृश्यता, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्कार यांचे मोठे ओझे होते.लहानपण अत्यंत हालअपेष्टांत गेले. शाळेत प्रवेश झाला; पण जातीय भेदभावामुळे शिक्षण टिकले नाही. औपचारिक शिक्षण जेमतेम काही दिवसांचे असले तरी ज्ञानाची भूक मात्र आयुष्यभर कायम राहिली. स्वतःच्या जिद्दीने त्यांनी अक्षरओळख करून घेतली आणि पुढे मराठी साहित्यविश्वातील सर्वोच्च लेखकांपैकी एक म्हणून ओळख निर्माण केली.

**मुंबईतील संघर्ष –** सन १९३२ मध्ये कुटुंबासह ते मुंबईत आले. जगण्यासाठी त्यांनी हमाली, गिरणीत काम, बांधकाम मजुरी, कोळसे वेचणे, फेरीवाल्यांचे सामान वाहणे, हॉटेलमधील काम अशा असंख्य कष्टाची कामे केली. मुंबईतील झोपडपट्ट्या, गिरणी कामगारांचे जीवन, उपासमार, अन्याय, शोषण आणि संघर्ष त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला. याच अनुभवांमुळे त्यांच्या साहित्याला वास्तवाचे अधिष्ठान मिळाले.

**सामाजिक आणि राजकीय जाणीव –** कामगारांच्या प्रश्नांमुळे ते समाजवादी आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळीशी जोडले गेले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यात त्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समता, स्वाभिमान आणि न्यायाच्या विचारांनी त्यांना खोलवर प्रभावित केले. अण्णाभाऊंच्या साहित्यामध्ये वर्गसंघर्ष आणि जातिव्यवस्थेविरुद्धचा आवाज एकाच वेळी दिसून येतो.

**लोकशाहीर म्हणून उदय –** सन १९४४ मध्ये अमर शेख आणि द. ना. गव्हाणकर यांच्या सहकार्याने लाल बावटा कलापथक स्थापन करण्यात आले. अण्णाभाऊंच्या पोवाडे, लावण्या, लोकनाटय यांनी आणि शाहिरीने महाराष्ट्रात सामाजिक जागृती निर्माण केली. त्यांनी तमाशाला केवळ करमणुकीचे साधन न ठेवता परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांच्या शाहिरीने लोकांना प्रेरणा दिली. 'मुंबई कुणाची?', 'महाराष्ट्राची परंपरा' यांसारख्या लोकनाट्यांनी आणि पोवाड्यांनी महाराष्ट्राच्या अस्मितेला नवी ऊर्जा दिली.

**अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यविश्व –** अण्णाभाऊ साठे हे मराठीतील अत्यंत विपुल लेखन करणाऱ्या साहित्यिकांपैकी एक होते. त्यांनी सुमारे ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, अनेक लोकनाट्ये, नाटके, पोवाडे, लावण्या, गीते आणि प्रवासवर्णने लिहिली.त्यांच्या साहित्यामध्ये राजे–महाराजे नाहीत तर झोपडपट्टीतील माणूस, मजूर, शेतकरी, भटक्या जमाती, दलित, स्त्रिया, अन्यायाविरुद्ध लढणारे सामान्य लोक हेच खरे नायक आहेत.त्यांच्या प्रमुख कादंबऱ्यांमध्ये फकिरा, वारणेचा वाघ, वैजयंता, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, रानगंगा, चित्रा, आवडी, अलगूज आणि इतर अनेक कादंबऱ्यांचा समावेश होतो. प्रत्येक कादंबरीत संघर्ष, स्वाभिमान, अन्यायाविरुद्धचा लढा आणि माणुसकीचा संदेश दिसून येतो.

**फकिरा' –** मराठी साहित्याचा अमर ग्रंथ मानला जातो.अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्याचा बाहुमूल्य हिरा मानल्या जाते. ही केवळ एका व्यक्तीची कथा नसून अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या संपूर्ण समाजाच्या संघर्षाची गाथा आहे.फकिरा हा स्वाभिमानी, धाडसी आणि लोकांसाठी जगणारा नायक आहे. दुष्काळ, भूक, अन्याय आणि सत्तेच्या दडपशाहीविरुद्ध तो लढतो. स्वतःपेक्षा समाजाला मोठे मानणारा हा नायक शेवटपर्यंत झुकत नाही. म्हणुनच ही कादंबरी केवळ साहित्यकृती नसून सामाजिक न्यायाचा जाहीरनामा मानली जाते.या कादंबरीस महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वायय पुरस्कार मिळाला आणि ती अनेक भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये अनुवादित झाली. 'फकिरा' कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना का अर्पण केली?अण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा' ही कादंबरी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी अर्पण केली. त्यामागील भावना अत्यंत अर्थपूर्ण होती. डॉ.आंबेडकरांनी दलित, शोषित आणि वंचित समाजाला स्वाभिमान, शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग दाखवला. अण्णाभाऊंना वाटत होते की फकिराचा लढा आणि बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक न्यायाचा विचार यांचे ध्येय एकच आहे माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळावा म्हणुनच त्यांनी ही कादंबरी बाबासाहेबांना कृतज्ञतापूर्वक समर्पित केली.

'जग बदल घालुनी घाव, सांगुन गेले मला भीमराव' हे गीत अण्णाभाऊ साठे यांच्या सर्वाधिक लोकप्रिय रचनांपैकी एक मानले जाते. या ओळींमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या परिवर्तनाच्या संदेशाचा सार दडलेला आहे.'जग बदल' म्हणजे अन्यायकारक व्यवस्था बदलणे; 'घालुनी घाव' म्हणजे अज्ञान, अंधश्रद्धा, जातिभेद, शोषण आणि विषमता यांवर प्रहार करणे. या गीताने महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना नवी दिशा दिली. आजही आंबेडकरी, परिवर्तनवादी आणि सामाजिक चळवळींमध्ये हे गीत मोठ्या अभिमानाने गायले जाते.

रशियाचा प्रवाससन १९६१ मध्ये अण्णाभाऊ साठे यांना तत्कालीन सोव्हिएत संघाकडून निमंत्रण मिळाले. त्यांनी तेथील समाज जीवनाचा अभ्यास करून 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवास वर्णन लिहिले. त्यातून त्यांच्या व्यापक सामाजिक दृष्टिकोनाची प्रचीती येते.

**शेवटची वर्षे –** ज्यांनी आयुष्यभर उपेक्षितांच्या वेदना मांडल्या, त्या महान साहित्यिकालाच आयुष्याच्या अखेरीस आर्थिक संकटे, आजारपण आणि उपेक्षा सहन करावी लागली. तरीही त्यांनी लेखणी कधी खाली ठेवली नाही.१८ जुलै १९६९ रोजी मुंबईतील गोरेगाव येथे त्यांचे निधन झाले. मात्र त्यांचे विचार, साहित्य आणि शाहिरी आजही लाखो लोकांना प्रेरणा देत आहेत.

**अण्णाभाऊ साठे यांचे कार्य आजही का महत्त्वाचे आहे?**

आज त्यांच्या साहित्याचा अभ्यास अनेक विद्यापीठांमध्ये केला जातो. त्यांच्या नावाने अध्यासन स्थापन झाले आहे. त्यांच्या साहित्याचे अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. त्यांनी मराठी साहित्याला केवळ शब्द दिले नाहीत, तर समाजाला स्वाभिमानाची भाषा दिली.त्यांच्या लेखनाने सिद्ध केले की लेखकाचे मोठेपण त्याच्या शिक्षणात नसते तर त्याच्या अनुभवात, संवेदनशीलतेत आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीत असते.

**कृतज्ञ अभिवादन –** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन म्हणजे संघर्ष, जिद्द, स्वाभिमान, माणुसकी आणि सामाजिक परिवर्तनाचा अखंड प्रवास होय. त्यांनी शब्दांना शस्त्र बनवले, शाहिरीला जनजागृतीचे माध्यम बनवले आणि साहित्याला समाजपरिवर्तनाची दिशा दिली.१ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करू या.

'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' हा संदेश केवळ गीत नाही तो समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायासाठी लढणाऱ्या प्रत्येक माणसाची प्रेरणा आहे.

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!**



भाऊसाहेब खडसे
शेंदुरजनाघाट

# पाऊस : निसर्गाचा वरदहस्त की इशारा?

पाऊस म्हणजे जीवन. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वाशी पावसाचे अतूट नाते आहे. भारतीय संस्कृतीत पावसाला केवळ ऋतू मानले जात नाही, तर तो आनंद, समृद्धी आणि नवजीवनाचे प्रतीक मानला जातो. शेतकऱ्यांसाठी पाऊस म्हणजे आशेचा किरण, तर शहरांसाठी तो उकाड्यापासून दिलासा देणारा असतो. मात्र अलीकडच्या काळात पावसाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. एकीकडे काही भागांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर दुसरीकडे अनेक प्रदेश दुष्काळाच्या छायेत राहतात. त्यामुळे आज पाऊस हा केवळ आनंदाचा विषय राहिलेला नसून तो निसर्गाचा गंभीर इशाराही ठरत आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. शेतीचे चक्र पावसाभोवती फिरते. वेळेवर आणि पुरेसा पाऊस झाला तर पिके बहरतात, धान्य उत्पादन वाढते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळते. परंतु पावसाने दडी मारली किंवा अतिवृष्टी झाली, तर शेतकऱ्यांच्या हातात निराशाच उरते. म्हणूनच भारतीय शेतकरी आजही आकाशाकडे आशेने पाहत असतो.

पावसाचे महत्त्व केवळ शेतीपुरते मर्यादित नाही. धरणे, तलाव, विहिरी, नद्या आणि भूजलसाठे पावसामुळे भरतात. शहरांना आणि गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते. जलविद्युत प्रकल्पांमधून वीज निर्मिती होते. उद्योगधंदे, पशुपालन, वनसंपदा आणि पर्यावरणाचा समतोल टिकविण्यात पावसाची मोठी भूमिका आहे. म्हणूनच पाऊस हा संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ मानला जातो.

मराठी साहित्यामध्ये पावसाचे विशेष स्थान आहे. कवींनी पावसाचे विविध रूपांत वर्णन केले आहे. कधी तो प्रेमाचा दूत बनतो, कधी विरहाची आठवण करून देतो, तर कधी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतो. पहिल्या पावसाचा सुगंध, हिरवाईने नटलेली धरती, डोंगरांवरून कोसळणारे धबधबे आणि पक्ष्यांचा किलबिलाट हे दृश्य प्रत्येकाच्या मनाला आनंद देणारे असते.

परंतु गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप चिंताजनक झाले आहे. पूर्वी चार महिने संतुलित पडणारा पाऊस आता काही दिवसांतच मुसळधार स्वरूपात कोसळतो. त्यामुळे पूर, दरडी कोसळणे, शेतीचे नुकसान आणि जीवितहानीच्या घटना वाढल्या आहेत. दुसरीकडे काही भागांत दीर्घकाळ पाऊसच पडत नाही. त्यामुळे दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि पिकांचे मोठे नुकसान होते. ही परिस्थिती हवामान बदलाचे गंभीर परिणाम अधोरेखित करते.




अतिवृष्टीमुळे शहरांमध्ये पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे, घरांमध्ये पाणी शिरणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणे हे चित्र दरवर्षी दिसते. यासाठी केवळ पाऊस जबाबदार नाही, तर अनियोजित शहरीकरण, नाल्यांवरील अतिक्रमणे, जलनिस्सारण व्यवस्थेचा अभाव आणि पर्यावरणाची होत असलेली हानीही कारणीभूत आहे. निसर्गाच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे परिणाम आज समाजाला भोगावे लागत आहेत.

ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. अवकाळी पाऊस, गारपीट आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. पिके हातातून जातात, कर्जाचा बोजा वाढतो आणि अनेक कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडते. त्यामुळे शेती अधिक शाश्वत करण्यासाठी जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण आणि हवामानानुसार शेती पद्धती स्वीकारण्याची गरज आहे.

जलसंधारण ही काळाची गरज बनली आहे. पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते जमिनीत मुरविणे, तलाव व बंधारे उभारणे, छतावरील पावसाचे पाणी साठवणे आणि वृक्षलागवड करणे या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता लोकचळवळ बनला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. जंगलतोड थांबविणे, वृक्षलागवड वाढविणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करणे ही आजची गरज आहे. निसर्गाशी संघर्ष न करता त्याच्याशी सुसंवाद साधणे हेच शाश्वत विकासाचे खरे सूत्र आहे.

शासनानेही पूर आणि दुष्काळ व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक वापर करणे आवश्यक आहे. हवामानाचा अचूक अंदाज, आपत्तीपूर्व सूचना प्रणाली, जलव्यवस्थापनाचे वैज्ञानिक नियोजन आणि शेतकऱ्यांसाठी प्रभावी विमा योजना यामुळे संकटांचा परिणाम काही प्रमाणात कमी करता येऊ शकतो. त्याचबरोबर नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेवटी, पाऊस हा निसर्गाचा अमूल्य आशीर्वाद आहे. तो आनंद, समृद्धी आणि जीवन घेऊन येतो. मात्र त्याच वेळी तो निसर्गाचा इशाराही आहे की, पर्यावरणाचा समतोल बिघडविल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. म्हणून पावसाचे स्वागत करताना त्यातील संदेश समजून घेणे आवश्यक आहे. जलसंधारण, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास यांचा मार्ग स्वीकारल्यासच भविष्यातील पिढ्यांना पावसाचे खरे वरदान अनुभवता येईल. पाऊस हा केवळ आकाशातून पडणारा जलधारांचा वर्षाव नाही, तर तो मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्परावलंबित्वाची जाणीव करून देणारा जीवनाचा अखंड उत्सव आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये दहशतवादी हल्ला : एकाचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**कुलगाम** – जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात दहशतवाद्यांनी स्थलांतरित मजुरांवर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात छत्तीसगडमधील एका मजुराचा मृत्यू झाला असून, दुसरा मजूर गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, दक्षिण काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील केलम परिसरात दहशतवाद्यांनी दोन स्थलांतरित मजुरांना अडवले. त्यानंतर त्यांची ओळख आणि धर्म विचारल्यानंतर त्यांच्यावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिली आहे. या हल्ल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि सुरक्षा दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.

**वरुड : उत्कृष्ट संत्रा उत्पादक शेतकरी ज्ञानेश्वर बेलसरे आजोबा यांच्या वाढदीवसा निमीत्त शुभेच्छा देतांना**



सुजित लेकुरवाळे, माजी नगराध्यक्ष रवी भाऊ थोरात, अभिजित चौधरी



**वरुड :** सुजित लेकुरवाळे, अभिजित चौधरी, अमोल चौधरी,भारत टाकरखेडे, प्रविण शिंगरवाडे, गजानन शिंगरवाडे, निशांत रत्नपारखी, सचिन टाकरखेडे व इंदिरा चौक मित्र परिवार

# बहिणीच्या प्रेमविवाहाचा संताप अनावर, भावाने मेहुण्याच्या डोक्यात दगड घातला अन पुढे... : मेहुण्याचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – बहिणीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्या समाजातील तरुणाशी प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून मेहुण्यावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना जामनेर तालुक्यातील फत्तेपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. या हल्ल्यात प्रशांत चौधरी (२५) हा गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते मात्र उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत चौधरी आणि संबंधित तरुणी हे वेगवेगळ्या समाजातील असून दोघांमध्ये काही काळापासून प्रेमसंबंध होते. कुटुंबीयांचा विरोध असल्याने त्यांनी सिल्लोड येथे जाऊन प्रेमविवाह केला. संबंधित तरुणी वडगाव सद्दो येथील आहे. विवाहानंतर दोघे एकत्र राहत असताना या नात्याबद्दल मुलीच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी होती.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ई-केवायसीची गती वाढवावी : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची पहिली यादी प्रसिद्ध झाली आहे. लवकरच उर्वरीत शेतकऱ्यांची यादी येणार आहे. त्यामुळे रविवारपर्यंत जिल्ह्यातील पहिल्या यादीतील ७६ हजार ९७६ शेतकऱ्यांची ई-केवायसी गतीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज तालुकास्तरावरील सहायक निबंधक आणि बँकांचे प्रतिनिधी यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी कर्जमाफीची प्रक्रिया राबविताना बँकांनी सजगपणे काम करणे आवश्यक आहे. बँकेच्या शाखेमधून प्रत्येक कर्जदार शेतकऱ्यांना दूरध्वनी करून त्यांना कर्जमाफीची माहिती देण्यात यावी. त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात यावे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने २ लाख रूपयांची कर्जमाफी होणार आहे, याबाबत माहिती देण्यात यावी. कर्जमाफी होण्यासाठी अॅग्रीस्टॅक हा महत्वाचा आहे. अॅग्रीस्टॅक नोंदणी नसल्यास तातडीने ही नोंदणी करण्यास शेतकऱ्यांना सांगावे. याकामी बँकांनी प्रयत्नपूर्वक कार्य करणे अपेक्षित आहे.

कर्जमाफीच्या अनुषंगाने येत्या शनिवार आणि रविवारी बँकांचे कामकाज सुरू ठेवण्यात यावे. याकामी स्वतंत्ररित्या दोन नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांच्याकडून कर्जमाफीबद्दल योग्य मार्गदर्शन करण्यात यावे. कर्जमाफीच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची सहमती घेताना त्यांना कर्जाच्या रकमेमध्ये फरक दिसत असला तरी उर्वरीत रक्कम बँक समायोजित करीत असल्याची माहिती देण्यात यावी. कर्ज माफीच्या प्रक्रियेत काही तक्रारी असल्यास त्या तातकाळ कळविण्यात याव्यात. त्यानुसार डाटामध्ये दुरूस्ती करण्यात यावी. जिल्ह्यात अद्यापही ७६ हजार ९७६ ई-केवायसीपैकी ४३ हजार ४३२ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. आपले सरकार केंद्र येथे शेतकऱ्यांची ही केवायसी मोफत होणार आहे. केंद्र चालकांनी शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी केल्यास केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार आहे. तसेच कर्जमाफीसाठी ई-केवायसीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३५७/२५-२६ दि.१५/०७/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **भानुदास दमडू बहुरुपी, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगा नामे प्रशांत भानुदास बहुरुपी, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०१/०७/१९९२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१५/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

# तुम्ही भूतकाळ, भविष्याशी खेळू नका : राहुल गांधी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार निशाणा साधला. 'पंतप्रधान मोदी आणि अमित शहा हे देशाचा भूतकाळ आहेत, त्यांनी भारताच्या भविष्याशी (जेन-झी) कसे वागावे याबद्दल सावध राहावे, असा थेट इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर त्यांच्यावर एफआयआर दाखल करणे आणि त्यांची सोशल मीडिया खाती बंद करण्यामागे मोदी आणि अमित शहा यांचाच हात असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले, पंतप्रधान मोदी आणि अमित शहा- तुम्ही 'जेन-झी'ला घाबरवून शांत करू शकत नाही. आधी तुम्ही त्यांचे खच्चीकरण केले, आणि आता तुम्ही त्यांच्यावर एफआयआर दाखल करत आहात आणि त्यांची सोशल मीडिया खाती बंद करत आहात. तुम्ही भारताचा भूतकाळ आहात. भारताच्या भविष्याशी कसे वागायचे याबद्दल जरा सांभाळून राहा. पंतप्रधानांचे वक्तव्य राहुल गांधी यांची ही टीका मोदी यांच्या त्या वक्तव्यानंतर आली आहे, ज्यामध्ये त्यांनी गुरुवारी स्पष्ट केले होते की पेपर फुटीच्या समस्येला तोंड देण्यासाठी केंद्र आणि राज्य या दोन्ही स्तरांवर शिक्षण पद्धतीत व्यापक सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. मुलांच्या भविष्याशी खेळणाऱ्या कोणत्याही टोळीला किंवा माफियाला सोडले जाणार नाही, असा इशारा पंतप्रधानांनी दिला होता.



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५६/२०२६ ने.ता.०४/०९/२०२६**

**अर्जदार :-**

ऋषिकेश निळकंठ धर्मे
वय अं.२३ वर्ष, धंदा-मजुरी
रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत साधना निळकंठ धर्मे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५७/२०२६ ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) वैशाली प्रमोदराव सावरकर, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम
२) सुधाबाई बाळकृष्ण सावरकर, वय अं.८३ वर्ष, धंदा- काही नाही
अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रमोद बाळकृष्णजी सावरकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५८/२०२६ ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) अंजना रामराव उईके, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, २) आशिष रामरावजी उईके, वय अं.३२ वर्ष, धंदा-मजुरी, ३) गिरीश रामराव उईके, वय अं.२६ वर्ष, धंदा- मजुरी, अर्जदार क्र.१ ते ३ रा.पंढरी, पो.पुसला, ता.वरुड, ४) आरती सुनिल कोकोडे, वय अं.३० वर्ष, धंदा- घरकाम, रा.मांडवी, ता.जि.छिंदवाडा (मध्यप्रदेश), ५) सारीका प्रविण मरसकोल्हे, वय अं.२८ वर्ष, धंदा- घरकाम, रा.आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामराव चंद्रभान उईके, रा.पंढरी, पो.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३४६/२५-२६ दि.१५/०७/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री रहीमबेग जुलफु बेग, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे रहीमबेग जुलफु बेग, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.११/०३/१९५३** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१५/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




### वंदे भारतमधून मानवी हृदयाचा 'प्रवास'

# अवयव प्रत्यारोपणसाठी सुरत ते अहमदाबाद वाहतूक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भारतीय रेल्वेच्या इतिहासात प्रथमच, एका जिवंत मानवी हृदयाची मुंबई सेंट्रल – गांधीनगर वंदे भारत एक्स्प्रेसने सुरत ते अहमदाबाद दरम्यान यशस्वी वाहतूक करण्यात आली.

यामुळे वेळेच्या मर्यादेत हृदय प्रत्यारोपणाची महत्त्वपूर्ण शस्त्रक्रिया करणे शक्य झाले. या ऐतिहासिक कामगिरीने 'वंदे भारत' एक्स्प्रेसचा वेग आणि



भारतीय रेल्वे, पश्चिम रेल्वे, रेल्वे सुरक्षा बल, गुजरात पोलीस व वैद्यकीय पथकांमधील उत्तम समन्वय अधोरेखित केला आहे. हे हृदय ट्रेन क्रमांक २०९०१ द्वारे सुरक्षितपणे अहमदाबादला पोहोचवण्यात आले. तेथील फलाट क्रमांक १ वरून विशेष तयार करण्यात आलेल्या 'ग्रीन कॉरिडॉर'द्वारे ते 'यू. एन. मेहता इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओलॉजी अँड रिसर्च सेंटर' येथे नेण्यात आले. या समन्वित प्रयत्नांमुळे हे अवयव कोणताही विलंब न होता रुग्णालयात पोहोचले, ज्यामुळे डॉक्टरांना वेळेवर जीवनरक्षक प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणे शक्य झाले. अहमदाबादचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक वेद प्रकाश यांनी सांगितले की, ही मोहीम भारतीय रेल्वेसाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. या जीवनरक्षक मोहिमांमध्ये प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. वंदे भारतच्या माध्यमातून जिवंत मानवी हृदयाची यशस्वी वाहतूक ही भारतीय रेल्वे, आरपीएफ, गुजरात पोलीस आणि वैद्यकीय पथकांच्या उत्कृष्ट समन्वयामुळेच शक्य झाली.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

## प्रसूतीवेळी बाळ जमिनीवर पडून अपघात, विरारमध्ये धक्कादायक प्रकार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विरार पश्चिमेतील डॉ.जोगळेकर रुग्णालयात प्रसूतीदरम्यान कथित वैद्यकीय हलगर्जीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सात महिन्यांच्या गर्भवती महिलेच्या प्रसूतीवेळी नवजात बालक अडीच ते तीन फूट उंचीवरून थेट जमिनीवर पडल्याचा गंभीर आरोप पीडित महिला आणि तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेत बालकाच्या डोक्याला दुखापत झाली असून



त्याच्यावर ठाणे येथील एनआयसीयू केंद्रात उपचार सुरू आहेत. आदल्या रात्रीपासून तीव्र प्रसूती वेदना होत असल्याने तसेच सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास बाळ बाहेर येत असल्याची जाणीव होत असल्याचे तिने वारंवार डॉक्टर आणि परिचारिकांना सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे.

### अल्पवयीन युवतीशी प्रेमाचे नाटक करुन तिला

## गर्भवती केल्याप्रकरणी युवकाविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – अल्पवयीन युवतीशी प्रेमाचे नाटक करुन तिचेशी शारिरीक संबंध प्रस्थापित करुन तिला गर्भवती केल्याप्रकरणी शेंदुजरनाघाट पोलिसांनी मध्यप्रदेशातील पांढरी येथील २५ वर्षीय युवकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी स्वप्नील हेमराज कुमरे (२५) व पीडीता मजुरीने कामाला आले असता यातील




आरोपी स्वप्नील याने पीडीता ही अल्पवयीन आहे, हे माहीत असुन असुन सुद्धा तीचे सोबत प्रेमाचे नाटक करुन पुन्हा पुन्हा भावनीक जवळीकता साधुन तिच्या अल्पवयीनपणाचा फायदा घेऊन तिचे सोबत १ ऑक्टोबर २०२५ ते २३ जुलै २०२६ च्या दरम्यान वारंवार शारिरीक संबध प्रस्थापीत करुन पिडीतेला गर्भवती केले व तिचे उपचार कामी तिला दाखल केल्यावर तिने दिलेल्या बयाणावरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी स्वप्नील हेमराज कुमरे (२५) रा.पांढरी, ता.प्रभात पटटण, जि.बैतुल मध्यप्रदेश याचे विरुध्द कलम ६४, २ एमबीएनएस २०२३ सहकलम ४ ए ६ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# किसान सन्मान निधी योजनेला ५ वर्षांची मुदतवाढ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### तेल आणि वायू उत्वननासाठी ८४ हजार कोटी रुपयांना मंजुरी

**मुंबई** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळ आणि केंद्रीय कृषी सहकारी संस्था परिषदेची (सीसीए) बैठक झाली. समुद्रमंथन, सूर्य सरोवर योजना, पीएम सन्मान निधी आणि खेलो इंडिया यासह अनेक योजनांवर निर्णय घेण्यात आले. बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाला माहिती दिली. त्यांनी सांगितले की, समुद्रमंथन नावाच्या एका मोठ्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. देशात तेल आणि वायू उत्पादनाचा शोध घेणे हा या योजनेचा उद्देश असून, त्यासाठी ८४,०८४ कोटी रुपयांचे बजेट मंजूर करण्यात आले आहे. देशातील तेल



आणि वायूच्या वाढत्या मागणीसाठी ही योजना एक मोठे परिवर्तन घडवून आणणारी ठरेल.

त्यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान सन्मान निधी योजना) आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे. सरकारने या कालावधीसाठी ३.१५ लाख कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहे.

सौर ऊर्जा निर्मितीला मंजुरी वैष्णव यांनी सांगितले की, या निर्णयांपैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे प्रधानमंत्री सूर्य सरोवर योजना (पीएमएसएसवाय). या योजनेअंतर्गत, पंतप्रधान मोदींनी जलस्रोतांच्या पृष्ठभागाचा वापर करून सौर ऊर्जा निर्मितीला मंजुरी दिली आहे. भारतामध्ये जलस्रोतांचा वापर करून १०२ गिगावॅट्स (ऋथ), म्हणजेच १,००,००० मेगावॅट्स सौर ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता आहे.

या योजनेअंतर्गत देशभरात एकूण ५,००० मेगावॅट तरंगती सौर पीव्ही (फोटोव्होल्टेइक) क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीत प्रति मेगावॅट १ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाईल. खेळो इंडिया योजनेसाठी २९,००० कोटी रुपयांची तरतूद देशातील क्रीडा संस्कृती आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

# जालन्यात मुसळधार पावसाने खरीप पिकांना दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जालना** – जालना जिल्ह्यात गुरुवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे उकाडा आणि दमट वातावरणापासून नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी अनेक भागांत पाणी साचल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. नद्या आणि नाले दुथडी भरून वाहू लागल्याने काही ठिकाणी पाणी साचले असून, सखल भागातील शेतांमध्ये खरीप पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अधिकृत माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या १२ तासांत जिल्ह्यात सरा-



सरी ८३.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. भोकरदन तालुक्यातील हसनाबाद महसूल मंडळात सर्वाधिक १५५.५ मिलिमीटर पाऊस झाला. जिल्ह्यातील एकूण ३९ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पावसाची नोंद झाली आहे.

जालना शहर आणि जालना ग्रामीण येथे प्रत्येकी ७८.८ मिमी, वाघरुळ ११०.५ मिमी, सेवली ११०.८ मिमी, रामनगर ९९.५ मिमी, भोकरदन १०८.५ मिमी, धावडा ११०.३ मिमी आणि आन्वा येथे १०२ मिमी पावसाची नोंद झाली. तसेच पिंपळगाव रेणुकाई, बकणे पांगरी, वारुड, वतूर, तळणी आणि पांगरी गोसावी या भागांतही ९६ ते ११३ मिमी दरम्यान पाऊस झाला.

या पावसानंतर जिल्ह्यातील चालू मान्सून हंगामातील एकूण पर्जन्यमान ३७१.४ मिमीवर पोहोचले आहे. हंगामातील सरासरी पर्जन्यमान ६०३.१ मिमी असल्याने अजूनही अपेक्षित पावसाची प्रतीक्षा आहे. तालुकानिहाय जालना तालुक्यात सर्वाधिक ४२३.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे सोयाबीन, कापूस, मका आणि ज्वारी या खरीप पिकांना मोठा फायदा होणार असला, तरी सखल भागातील शेतांमध्ये पाणी साचल्याने मुळे कुजण्याचा आणि पिके खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

